MHRG120003422018

**R.C.S./25/2018**
**Liladhar and Anr. Vs. Chintamani and Ors.**

**निशाणी क्र.६९ कडील आदेश**

प्रतिवादी क्र.२ ने त्याचे विरुध्द दिनांक १९.०६.२०२५ रोजी झालेला "पुरावा बंद" आदेश रद्द करण्यासाठी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, दरम्यानच्या काळात प्रतिवादी क्र.१ हे गहाळ झालेले असल्याने व प्रतिवादी क्र. २ व ३ हे आजारी असल्याने न्यायालयात हजर राहून पुरावा देणे शक्य झाले नव्हते. या कारणा व्यतिरिक्त पुरावा न देण्यामागे इतर कोणतेही कारण नाही. न्यायालयाचे आदेशाचा अवमान करण्याचा प्रतिवादीचा कोणताही उद्देश नव्हता व नाही. प्रतिवादीस त्याचा पुरावा न्यायालयासमोर ठेवण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. तशी संधी न मिळाल्यास त्याचे अपरिमित नुकसान होणार आहे. शेवटी प्रतिवादी क्र.२ ने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. वादीतर्फे सदर अर्जावर आक्षेप घेण्यात आला की, अर्जास जोरदार हरकत आहे. अर्जातील कारणांच्या पुष्ठयर्थ प्रतिवादीने कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. तरी प्रतिवादीचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा.

३. प्रस्तुत अर्ज, वादीचे म्हणणे व अभिलेख इ.चे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

४. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादींनी त्यांचा पुरावा बंद केल्यानंतर प्रतिवादींना त्यांचा पुरावा दाखल करण्यासाठी पुरेशी संधी देण्यात आली. प्रकरण ५ वर्षांपेक्षा जास्त जुने असल्याने व प्रतिवादींनी पुरावा सादर न केल्याने त्यांचेविरूध्द दिनांक १९.०६.२०२५ रोजी 'पुरावा नाही' असे आदेश पारीत करण्यात आले. प्रतिवादी क्र.२ ने त्याच्या अर्जातील कारणांच्या पुष्ठयर्थ कागदोपत्री पुराव सादर केलेला नसला तरी दाव्याचा निकाल गुण–अवगुणावर लागण्यासाठी व प्रकरणांची बाहुल्यता टाळण्यासाठी प्रतिवादी क्र.२ यास पुरावा सादर करण्यासाठी एक संधी देणे आवश्यक आहे या मतास मी पोहचलो आहे. त्याचवेळी दाव्याच्या सुनावणीस झालेल्या विलंबाबाबत प्रतिवादी क्र.२ ने वादींना ६००/– रुपये खर्च देणे आवश्यक आहे. करीता मी खालील आदेश पारित करतो –

**<u>आदेश</u>**

१. अर्ज निशाणी ६९ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीने वादीस रू.६००/- खर्चाच्या स्वरुपात देण्याच्या अटीवर त्याचे विरुध्द पारीत झालेला दिनांक १९.०६.२०२५ रोजीचा "पुरावा बंद'' आदेश रद्द करण्यात येत आहे.

स्वाक्षरी/-

( घन:शाम रा.तिवारी )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड

दिनांक : २२-०९-२०२५